# International Journal of All Research Education & Scientific Methods

An ISO Certified Peer-Reviewed Journal
ISSN: 2455-6211

IMPACT FACTOR: 7.429

**One Day National Conference on Yashwantrao Chavan and Panchayat Raj System," held on 26th March, 2022 was organized by LokSanwad Foundation Aurangabad, Maharashtra.**

Scanned by CamScanner

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

# ... अनुक्रम...


| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. आर. के. काळे | १२ |
| २) | डॉ. सायबण्णा घोडके | १७ |
| ३) | प्रा. डॉ. अरुण बावा | २० |
| ४) | डॉ. मधुकर गुलाबराव शिंदे | २३ |
| ५) | प्रा. डॉ. वाय. ई. भालेराव | २७ |
| ६) | प्रा. डॉ. सुनिता अविनाश शिंदे | ३१ |
| ७) | किरण रामकृष्ण राऊत, डॉ. रमाकांत तिडके | ३५ |
| ८) | डॉ. प्रा. शेख एजाज एन, शेख इस्माईल मेहबुब | ३७ |
| ९) | अशोक रामचंद्र गोरे | ४० |
| १०) | प्रा. संतोष मारकवाड | ४३ |
| ११) | प्रा. डॉ. भिन्हे डी. पी. | ४८ |
| १२) | राजरत्न शं. गवई | ५१ |
| १३) | डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ 'वेदार्थ' | |
| १४) | प्रा. डॉ. संजय बापुराव वाकळे | ५७ |
| १५) | प्रा. डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे | ६२ |
| 16) | Dr. Ajay Sahebrao Deshmukh,<br>Dr. Ravikiran Jaydeo Swant | 66 |
| १७) | डॉ. उमाकांत राठोड, संभाजी अंकुश तांवे | ७० |
| १८) | डॉ. गंगणे अमोल उत्तमराव | ७४ |
| १९) | प्रा. दीक्षित साहेबराव ज्ञानोबा | ७८ |
| २०) | प्रा. जोगदंड मकरंद बळीराम | ८२ |
| २१) | डॉ. महेश विनायक रोटे | ८६ |
| २२) | डॉ. मनिषा सुरासे | ८९ |
| २३) | डॉ. नीता र. तोरणे | ९२ |
| २४) | प्राचार्य डॉ. दीपक गोविंद देशपांडे | ९६ |
| २५) | प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव | ९९ |
| २६) | प्रा. मुलाणी एस. पी. | १०३ |
| २७) | प्रा. परसराम एकनाथ शेळके | १०७ |
| 28) | Mr. Sachin N. Sanap | 110 |
| २९) | डॉ. दीपक भुसारे | ११३ |
| ३०) | डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव | ११६ |
| 31) | Dr. Yogesh A. Patil | 122 |
| ३२) | प्रा. माधवी सुरेंद्र पवार | १२४ |
| ३३) | डॉ. मधुकर विठोबा जाधव | १३० |
| ३४) | स्वाती चेके | १३३ |
| ३५) | छाया श्रीमंत साळवे | १३७ |
| ३६) | डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार | १४१ |
| ३७) | श्री. विश्वास शहाजीराव यादव | १४५ |
| ३८) | प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण, प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड | १४८ |
| ३९) | डॉ. खाडप संजय बापुराव | १५३ |
| ४०) | सखाराम शहादेव शिंदे | १५६ |
| ४१) | प्रा. डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे, श्री. विष्णू कडूबा देवरे | १५९ |
| ४२) | मोरे किरण मोहो | १६३ |
| ४३) | डॉ. साहेब राठोड, गणेश मारोती कचरे | १६७ |
| ४४) | डॉ. नामानंद गौतम साठे | १७० |
| ४५) | प्रा. डॉ. रमाकांत तिडके, श्रीमती संजीवनी दिगंबर डावकर | १७४ |
| ४६) | डॉ. जयश्री आसाराम ठाकेकर | १७७ |
| ४७) | उज्मा ऐनोद्दीन सिद्दीकी | १८० |
| ४८) | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, उर्मिला नारायण क्षीरसागर | १८२ |
| ४९) | डॉ. किरण नामदेव गायकवाड | १८६ |
| ५०) | प्रा. डॉ. सोनकांबळे चेतना प्रल्हाद, डॉ. सांगुरे दिपक प्रल्हाद | १९० |
| ५१) | डॉ. ऊर्मिला जनार्दन कनवंदे | १९५ |
| ५२) | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, अनिता मदनराव शिंदे | १९८ |
| 53) | Dr. Nirmal E. S. | 202 |
| ५४) | लोंढे अभिजीत शंकरराव | २०६ |
| ५५) | प्रा. डॉ. कृष्णा भवारी | २११ |
| ५६) | लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव | २१५ |
| 57) | Vinyak Nikas | 218 |
| ५७) | घायतडके सचिन सहादू | २२१ |
| 58) | Rakhonde M. K. | 226 |
| ५९) | प्रा. डॉ. कालिदास दिनकर फड | २३१ |
| ६०) | डॉ. प्रतिभा चिकमठ | २३३ |
| ६१) | शिंदे सखाराम बाबूराव | २३८ |
| ६२) | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, मिनाक्षी मोतीराम इंगळे | २४३ |
| ६३) | कु. सोनाली लक्ष्मणराव इंगळे | २४६ |
| ६४) | पवार रागिणी व्यंकटराव | २४९ |
| ६५) | प्रा. दत्तात्रय दादासो जाधव | २५३ |
| ६६) | अभिनिता लक्ष्मण बनकर | २५८ |
| ६७) | प्रिती किशोर ढेपे | २६२ |




Scanned by CamScanner

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

# महाराष्ट्राचे शिल्पकार- यशवंतराव-वसंतराव आणि पंचायतराज

प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण[1], प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड[2]

[1]शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, ता. कळंब, जि. उस्मानाबाद.
[2]संशोधन मार्गदर्शक व समाजशास्त्र विभागप्रमुख, दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

## प्रस्तावना

यशवंतराव चव्हाण हे स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, महाराष्ट्र घडवण्यात यशवंतराव चव्हाण यांनी महत्वपूर्ण भूमिका पार पाडलेली आहे. त्यामुळे त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' या नावाने ओळखले जाते. यशवंतराव चव्हाण हे नवमहाराष्ट्राचे शिल्पकार, शेतकरी कुटुंबातून स्वतःच्या कर्तृत्वावर यशाची एक एक पायरी चढत जाणारे एकसच्चा राजकारणी, एक सुसंस्कारित व्यक्तिमत्व होत. लोक शाहीतील सर्व संकेत निष्ठेने सांभाळणारे नेते , महाराष्ट्रातील विविध जाती समूहांना आपले वाटणारे एक कु शल संघटक व य शस्वी राजकारणी होत. १९५६ मध्ये द्वैभाषिक महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रिपद स्विकारल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला वाहून घेतले. म्हणून य शवंतराव चव्हाणांची ओळख ही महाराष्ट्रराज्याच्या निर्मितीचे जडणघडणीतील मुख्य शिलेदार व शिल्पकार अशी ओळख आहे. कारण की, यशवंतराव चव्हाण साहेबांनी केलेले कार्य हे अतुलनीय होते, याचे अनेक पुरावे व कार्याची पावती हे राज्यातील जनतेनी प्रत्यक्ष पाहिलेले आहेत.

वसंतराव नाईक यांचा जन्म हे बंजारा समाजातील शेतकरी कुटुंबात पुसद तालुक्यातील गहुली या गावी झाला. वसंतराव नाईक यांनीशिक्षण घेतल्यानंतर वकिलीच्या व्यवसायाला प्रारंभ केला. वकिली करत असतांना पुसदच्या सामाजिक, राजकीय, व सार्वजनिक जीवनास त्यांनी सुरुवात केली होती. वसंतराव नाईक यांना असे वाटत होते की , समाज सुधारणेच्या चळवळीचा उद्देश राजकारणा शिवाय साधू शकत नाही. म्हणून त्यांनी राजकारणात प्रवे श केला. १९४६ला नगर परिषदेचे अध्यक्ष , १९५२साली आमदार ते उपमंत्री , मंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे ( १९६३-१९७५) म्हणजेच सलग ११वर्षे मुख्यमंत्री म्हणून अतुलनीय कार्य करणारे प्रभावी मुख्यमंत्री म्हणून दे शाला परिचित झाले. महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि पायाभरणीत यशवंतराव चव्हाण यांच्या सोबत काम करुन व शिकवण घेवून सक्षम व विकसित महाराष्ट्र निर्माण करण्यामध्ये मोलाचे योगदान नाईक साहेबांनी दिलेले आहे.

महाराष्ट्र हे वै शिष्टयपूर्ण असे राज्य आहे. या राज्याला महात्मा फुले , राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच महाराष्ट्रातील अन्य समाजसुधारक यांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. या समाजसुधारकांच्या विचाराने व कार्याने यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक हे प्रभावित होउन महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या व शेतक यांच्या उद्धाराचे कार्य केलेले आहे. पंचायतराज संस्थेची निर्मितीच ख या अर्थाने ग्रामीण भागातील लोकांना राजकारणात सहभागी करण्यासाठी तयार करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील सर्वच लोकांना राजकीय संधी मिळाली पाहिजे , या विचाराचे नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक होते. म्हणून त्यांच्या विचारातून राज्यात पंचायतराज संस्थेची निर्मिती प्रक्रियेला सुरुवातकरण्यात आली. वसंतराव नाईक यांनी पंचायतराज संस्थेला महत्वपूर्ण असा प्रारुप दिलेला आहे.



Scanned by CamScanner

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- पंचायतराज व्यवस्था व लोकशाही विकेंद्रीकरणातील पंचायतराज व्यवस्थेची भूमिका समजून घेणे.
- यशवंतराव चव्हाण यांचे पंचायतराज निर्मितीतील भूमिका जाणून घेणे.
- वसंतराव नाईक यांचे पंचायतराज निर्मितीसाठी नाईक समितीचे अध्यक्ष म्हणून केलेले कार्य जाणून घेणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोध निबंध हे वर्णनात्मक पध्दतीने लिहिले जाणार आहे. यासाठी दुय्यम साधनाचा आधार घे तलेलाआहे. यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्यावर लिखित अभ्यासपूर्ण साहित्याचा संशोधन लेख लिहिताना आधार घेतलेला आहे.

**पंचायतराज व्यवस्था व लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया:**

पंचायतराज म्हणून ज्या व्यवस्थेचा निर्दे श भारतभर केले जाते ती व्यवस्था प्राचीन काळापासून भारतामध्ये अस्तित्वात होती. आणि भविष्यात देखील ती कायमस्वरुपी टिकून राहणार आहे. भारतात पंचायतराजलाच राजकीय तात्विक बैठक देताना लोकशाही विकेंद्रीकरण असेही संबोधले आहे. समाजाचा सर्वांगीण विकास हा कोणत्याही कल्याणकारी राज्याचा उद्दे श असतो. राज्यातील मग तो समाज ग्रामीण असो वा शहरी, त्यांचे हित संवर्धित करणे सत्तेवर येणा -यांचे कर्तव्य असते. भारतातील अधिक लोक हे ग्रामीण जीवन जगतात आणि ग्रामीण भागात राहतात , त्यामुळे अविकसिततेचे प्रमाण अधिक आहे. त्यांच्या विकासासाठी सततची धडपड करणा-या व्यक्ती, समूह, संस्था, संघटना व शासन इत्यादी घटक असतात.

भारतीय समाजव्यवस्थेचा प्राण हा खेड्यातून आहे. साहजिकच राजकीय विचार व त्यांचा प्रभाव खेड्यापर्यंत पोचला पाहिजे. खेड्यातून कार्यरत असलेल्या ग्रामीण स्थानिक स्व शासन संस्थांशी संपर्क साधूनच नवीन विचार व नवीन व्यवस्था रुजविली जाऊ शकते. ग्राम हेच सर्व गोष्टींचे केंद्र असावे लागते. हे भारतीय मूळ संस्कृतीचे सूत्र सोडूनच कार्य केले जाते. त्यामुळे नेमकी दि शा त्यांना दिली जात नाही व तेही आपली नेमकीदि शानिर्धारित करू श कत नाहीत. म्हणून स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर महात्मा गांधीजींनी स्पष्ट केले की,"भारतीय स्वातंत्र्याची सुरुवात तळापासून व्हायला पाहिजे. प्रत्येक खेडे हे गणराज्य बनले पाहिजे किंवा पंचायतीला सर्व अधिकार असले पाहिजे. जास्तीत जास्त अधिकार म्हणजे जनतेचे जास्त हित होय."महात्मा गांधी पुन्हा या विचाराला अनुसरून असे म्हणतात की,"स्वराज्य म्हणजे अंतिम अधिकार शेतकरी व कामकरी यांनाच असले पाहिजेत. खरी लोक शाही वीस लोक केंद्रात बसून चालवू शकत नाहीत. या लोक शाहीला क्रियान्वित करण्यासाठी निम्नस्तरावर असलेल्या प्रत्येक गावातील लोकांची गरज आहे."महात्मा गांधींनी व्यक्त केलेल्या विचारांची गरज त्या काळात महत्वाची होती. परंतु काही काळानंतर गांधीजींचे विचार दे शात आणि वेगवेगळया राज्यात पंचायतराजच्या स्वरुपातून य शस्वीपणे राबविलेले दिसून येतात. कारण की , यामध्ये ग्रामीण समाजाला अग्रस्थानी ठेवून पंचायतराजची भूमिका स्पष्ट करण्यात आलेली आहे.

पंचायतराज व्यवस्थेतील विकासकार्याचा मुख्य घटक म्हणून त्याची कार्येही बलवंतराय मेहता समितीने निश्चित केली आहेत. विकासाची मुख्य संस्था म्हणून तिलाच प्राधिकृत केले आहे. कृषी , पशुसंवर्धन, सहकार, लघुपाटबंधारे, ग्रामोद्योग, प्राथमिक शिक्षण, स्थानिक दळणवळण, आरोग्यविषयक बाबी, स्वास्थ्य, औषधोपचार, स्थानिक सुखसोयी व तत्सम विषय असा कार्याचा परीघ त्या पंचायत समितीबाबत निश्चित करुन देण्यात आला होता. तसेच ग्रामीण भागातील विकासाच्या दृष्टीने ग्रामपंचायतची निर्मिती आणि यांना अनुदान देण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेची निर्मिती करण्यात आलेली आहे. हे सर्व वसंतराव नाईक समितीने केलेल्या शिफारसच्या आधारे महाराष्ट्रात अमलबजावणी करण्यात आलेली आहे. म्हणून

Scanned by CamScanner

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

राज्याच्या निर्मिती, विकास व परिवर्तनासाठी य शवंतराव व वसंतराव यांनी अनमोल असे कार्य केले आहे. ग्रामीण समाज व शेतकरी यांना केंद्रबिंदू मानून त्यांना देखील राजकारणात सहभाग देता यावा यासाठी पंचायतराजची निर्मिती करण्याचे धोरण यशवंतरावांनी आखले आणि ही जबाबदारी वसंतराव नाईक यांच्या वर सोपविली. कालांतराने महाराष्ट्रात हे कार्य व शक्ती झालेले दिसते.

**यशवंतराव चव्हाण आणि पंचायतराज:**

यशवंतराव चव्हाण यांना ग्रामीण भागातील जनतेला प्र शासकीय अनुभवातून तयार करावयाचे होते. म्हणून त्यांनी लोकशाही विकेंद्रीकरणाला प्रोत्साहन दिले. लोक शाही विकेंद्रीकरण समितीचे अध्यक्ष म्हणून वसंतराव नाईक यांची नियुक्ती केली. वसंतराव नाईक यांनी लोक शाही विकेंद्रीकरणाचा संपूर्ण अभ्यास करून सभागृहात अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या शिफारशीच्या आधारावरच जिल्हा परिषदांची निर्मिती करण्यात आली. म्हणून विकेंद्रीकरणाचे (जिल्हा परिषद निर्मितीचे)कर्णधार म्हणून वसंतराव नाईक साहेब हेच आहेत. कारण की . विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना राज्याच्या प्रत्यक्ष राजकारणात आणणे . राजकीय परिवर्तन घडवून आणणे आवश्यक वाटत होते. म्हणून त्यांनी ही संकल्पना मांडली व पुढे याला मान्यता देवून ग्रामीण भागातील लोकांना तिन्ही स्तरातून राजकारणातील संधी उपलब्ध करून दिली. यामुळे ग्रामीण भागातील लोकांकडून ग्रामीण विकासासाठी प्रयत्न होऊ लागले. यामुळे ग्रामीण समाजात जनजागृती निर्माण झाली. हे सर्व पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण भागातील लोकांना मिळालेल्या संधी मुळे शक्य झालेले दिसून येते. पंचायतराजमुळे १९६० नंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास व परिवर्तनाच्या चळवळीला सुरुवात झालेली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री म्हणून नेतृत्व करताना आणि स्वातंत्र्य लढ्यात मूलभूत लोक शाही मूल्यांबरोबरच सत्तेच्या विकेंद्रीकरणाला म्हणजेच पंचायतराज व्यवस्थेला आणि ग्रामीण पुनर्रचनेसाठी अर्थक्षेत्रातील सहकारी सहकाराला प्राधान्य दिले. य शवंतराव चव्हाण एक कृति शिल लोक शाहीवादी नेतृत्व होते. लोक शाहीची तत्वे त्यांनी केवळ सभा-संमेलनातून व्यक्त केली नाहीत तर जाणीवपूर्वक व प्राणप्रतिष्ठेने लोक शाहीच्या तत्वांची अंमलबजावणी स्वतः आयुष्यात केल्याचे दिसून येते. पंचायतराज हा भारतीय राजकारणाचा हजारो वर्षांपासून चालत आलेला अनमोल वारसा आहे हे त्यांनी ओळखले होते. राजकारणाचा प्रवाह शहरी व मध्यमवर्गीय वरिष्ठ जातींमध्येच अडकून न राहता तो खेड्यापाड्यातील सामान्य माणसापर्यंत जावा, बहुजन समाजाच्या हातात सत्ता यावी यासाठी त्यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग महाराष्ट्रात जाणीवपूर्वक राबवला. भारत हा खेडयांचा दे श असून, शेतकरी हा भारतीय लोक शाहीचा खरा पोशिंदा आहे याचे भान त्यांच्याकडे होते. हा शेतकरी आर्थिकदृष्ट्या सबल करण्यासाठी पंचायतराज बरोबर सहकार चळवळी शी त्यांनी समन्वय साधला. उदारमतवादी कल्याणकारी लोक शाहीचे खंबीर आधार म्हणून ते पंचायतराज व्यवस्था व सहकार चळवळीकडे पाहत होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर काही काळातच महाराष्ट्र राज्याला अनुकूल अ शी पंचायत राज्याची रचना सुचवण्याची जबाबदारी वसंतराव नाईक यांच्यावर तातडीने सोपवली. नाईक समितीने पंचायतराज पद्धतीचा जो आराखडा तयार केला, त्यामधून ग्रामीण नेतृत्वाला विकसित होण्याची व सत्तेत सहभागी होण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली.

**वसंतराव नाईक आणि पंचायतराज:**

यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात वसंतराव नाईक मंत्री व सलग तीन वेळेस म्हणजेच तब्बल अकरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्या पदावर विराजमान होते. या त्यांच्या एकूणच कारकिर्दीत वसंतराव नाईक यांनी आमूलाग्र असे धोरणात्मक पाऊल उचलले आणि काळानुसार राज्यात परिवर्तन घडवून आणले. म्हणून नाईक साहेबांना आधुनिक महाराष्ट्राच्या पायाभरणीतील महत्वाचे नेतृत्व मानले जाते. राज्याच्या प्रगतीचा पाया अथवा रचना य शवंतराव चव्हाण यांनी मांडलेली आहे, तर कळस म्हणजेच राज्याची बांधणी वसंतराव नाईक यांनीच केली . असे राज्यातील सर्वसामान्य जनतेचा

Scanned by CamScanner